# Avert Petrol Pump Dacoiety

# व्यापाऱ्यास लुटणाऱ्या तिघांना अटक

## पेट्रोलपंपावरील दरोड्याचाही कट उधळला; आझादनगर पोलिसांची कामगिरी



धुळे : जिल्हा पोलिस कार्यालयात शुक्रवारी विविध कारवाईची माहिती देताना पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील. शेजारी (डावीकडून) निरीक्षक रमेशसिंह परदेशी, उपअक्षीक्षक चंद्रकांत गवळी, 'एलसीबी'चे निरीक्षक देविदास शेळके आदी.

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. ३ : शहरातील पारोळा रोडवर गुरुवारी रात्री साडेआठनंतर पेट्रोलपंपावर दरोडा टाकण्याचा कट पाच संशयितांना आखला. तत्पूर्वी, तो सतर्क आझादनगर पोलिस ठाण्याच्या पथकाने उधळून लावला. यात तीन संशयितांना अटक करण्यात पोलिसांना यश आले, तर दोन संशयित मात्र पळून जाण्यात यशस्वी ठरले. याच संशयितांनी शहरातील तेल व्यापाऱ्यास लुटीची कबुली दिल्याची माहिती पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी आज दिली. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे निरीक्षक देविदास शेळके उपस्थित होते.

आझादनगर पोलिस ठाण्याचे निरीक्षक रमेशसिंह परदेशी, उपनिरीक्षक आर. डी. गावडे, हवालदार संजय बोरसे, उमेश चव्हाण, पंकज चव्हाण, शंकर महाजन, कपिल लिंगायत, किरण सावळे, मनोज बागूल, पंकज खैरमोडे, नीलेश महाजन, पानपाटील गुरुवारी रात्री आठला पेट्रोलिंगसाठी निघाले. पारोळा रोडवरील कृषी महाविद्यालयाजवळ लिंबाच्या झाडाच्या आडोशाला चार ते पाच संशयित दबा धरून बसल्याचे दिसले. तेथे मोटारसायकली होत्या. संशयावरून त्यांना ताब्यात घेण्यासाठी पथकाने झडप घातली. यामध्ये धुळे शहरातील मयूर ऊर्फ बब्बू सुरेश कंदारे (वय २२, रा. अहिल्यादेवी नगर), अक्षय ऊर्फ नीलेश अप्पासाहेब औताडे (२०, रा. स्टेशन रोड), संतोष चंद्रकांत शिंदे (२०, रा. अहिल्यादेवीनगर) पथकाच्या गळाला लागले. मनोज मच्छिंद्र शार्दूल, पुंडलिक ऊर्फ भय्या कदम मोटारसायकलने पळून गेले.

### व्यापारी लुटीची कबुली

**पोलिस अधीक्षक पाटील यांनी सांगितले, की शहरातील पाटील मंगल कार्यालयाजवळून ३० जूनला रात्री साडेआठला तेलाचे व्यापारी मनोज घेवरचंद बोरा (जैन) घरी जात होते. त्यावेळी त्यांना काही गुंडांनी मारहाण करीत सव्वा लाख रुपये लुटून नेले. या गुन्ह्याची आझादनगर पोलिसांनी पेट्रोलपंपावरील दरोड्यापूर्वी पकडलेल्या संशयितांनी कबुली दिली आहे.**

### प्राणघातक साहित्य जप्त

तपासानंतर या संशयितांनी हॉटेल शांतीसमोरील राहुल पेट्रोलपंपावर दरोड्याचा कट आखल्याचे समोर आले. त्यांच्या पूर्वतयारीपूर्वीच आझादनगर पोलिसांच्या पथकाने हा डाव हाणून पाडला. ताब्यातील तीन संशयितांकडे असलेला चाकू, मिरची पूड, बेसबॉलचा दांडा, काळे फडके, मोबाईल, मोटारसायकल (एमएच १८ एक्यू १३२१) जप्त करण्यात आली. पाचही संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तिघांना अटक झाली. पोलिस अधीक्षक पाटील, अप्पर अधीक्षक चंद्रकांत गवळी, उपअधीक्षक संदीपान कांबळे, निरीक्षक परदेशी यांच्या सहकार्याने सहाय्यक निरीक्षक डी. ए. पाटील तपास करीत आहेत.

**<u>Azadnagar Police-</u>**

Earthen up gang of Dacoits and detected a robbery and also disclosed a plan to loot a petrol pump in Dhule.